महाराष्ट्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय
स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेले
वयोवृध्द खेळाडू तसेच किताब प्राप्त
कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये
वाढ करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : क्रीडायो-२०१२/(प्र.क्र.६४/१२)/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ डिसेंबर, २०१२.

वाचा :- (१) शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक-सेनिवे-१०९१/प्र.क्र.८२/क्रीयुसे-१, दिनांक १० जून,१९९३,
(२) शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-१०९७/प्र.क्र.४०३/क्रीयुसे-१, दिनांक ५ फेब्रुवारी,१९९८,
(३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग क्रमांक-राक्रीधो -२०००/प्र.क्र.१४४/०३/क्रीयुसे-१, दिनांक ८ मे,२००१,
(४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग क्रमांक-क्रीडायो-२००३/प्र.क्र.१४७/०३/क्रीयुसे-१, दिनांक ७ मे,२००७,
(५) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग क्रमांक-क्रीडायो-२००८/प्र.क्र.२१२/०८/क्रीयुसे-१, दिनांक ६ मार्च,२०१०
(६) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग विभाग क्रमांक-क्रीडायो-२००९/प्र.क्र.२६८/०९/क्रीयुसे-१,दिनांक १७ एप्रिल,२०१०

प्रस्तावना :- राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन देण्याची योजना प्रथमत: उपरोक्त दिनांक १० जून,१९९३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानंतर उपरोक्त दिनांक ५ फेब्रुवारी, १९९८ च्या शासन निर्णयान्वये मानधनात वाढ करण्यात आली असून, कुस्ती या खेळामध्ये "हिंद केसरी", "रुस्तमे हिंद", "महान भारत केसरी" व "भारत केसरी" हे किताब मिळविलेल्या कुस्तीगीरांच्या मानधनात उपरोक्त दिनांक ८ मे, २०११ च्या शासन निर्णयान्वये वाढ करण्यात आली असून उपरोक्त दिनांक ७ मे, २००७ च्या शासन निर्णयान्वये वयोवृध्द खेळाडूंसाठी मानधन देण्यासाठी घालण्यात आलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.१.०० लाख पर्यन्त वाढविण्यात आली आहे. तसेच उपरोक्त दिनांक ६ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र केसरी" या किताबाचा मानधन योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. अंतिमत: उपरोक्त दिनांक १७ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयान्वये कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने केलेली मागणी विचारात घेऊन राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर

अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू  तसेच किताब प्राप्त कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**: <u>शा स न  नि र्ण य</u> :** राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू  तसेच किताब प्राप्त कुस्तीगीरांना पुढीलप्रमाणे सुधारित मासिक मानधन शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :-

| अ.क्र. | बाब | प्रचलित दराने प्रतिमाह मानधन रुपये | महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेने मागणी केलेल्या सुधारीत मानधानाचे दर | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | राष्ट्रीय स्तर | रु.१५००/- | राष्ट्रीय स्तर, | रु.२५००/- |
| २ | आंतरराष्ट्रीय स्तर | रु.३०००/- | ऑलिंपिक/जागतिक अजिंक्य पद कुस्ती स्पर्धा | रु.६,०००/- |
| | | | आशियाई अजिंक्य पद/एशियन गेम्स/ इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा | रु.४,०००/- |
| | | | राष्ट्रकुल स्पर्धा | रु.४,०००/- |
| | | | अर्जुन पुरस्कार | रु.६,०००/- |
| ३ | हिंद केसरी, रुस्तुमे हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी, महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त कुस्तीगीर | रु.४०००/- | हिंद केसरी | रु.६,०००/- |
| | | | रुस्तुमे हिंद केसरी | रु.६,०००/- |
| | | | भारत केसरी | रु.६,०००/- |
| | | | महान भारत केसरी | रु.६,०००/- |
| | | | महाराष्ट्र केसरी | रु.६,०००/- |

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-प्र.क्र.२९४/१२/व्यय-५, दिनांक ५/०५/२०१२) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. यावर होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४-क्रीडा व खेळ (०८)(०२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन (२२०४ १६५८)-३१ सहाय्यक अनुदाने, योजनेतर" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याखालील मंजूर तरतूदीमधून मागविण्यात यावा.

D:\2012/CR 64.2012

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक- २०१२१२२११५१७४५७६२१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि.शां.परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(४) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
(५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(६)सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, (संचालनालयामार्फत)
(७) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (संचालनालयामार्फत)
(८) मा.मंत्री (क्रीडा)/मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
(९) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
(१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(११) अवर सचिव क्रीयुसे-१/क्रीयुसे-३
(१२) निवड नस्ती (क्रीयुसे-२).